विनियम क्रमांक ०९/२०२६

ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभागाची निर्मिती व कार्यपध्दती तसेच ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफिसर व सहाय्यक ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफीसर नियुक्तीबाबत विनियम

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५ (४७) (ज) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठाचे उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद करणे.

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५ (३६) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठ, महाविद्यालये, प्रशाळा व परिसंस्था यांच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत निरोगी वातावरण, समूह जीवन आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृध्दीसाठी व्यवस्था करणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५६ (१) नुसार विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकार व कर्तव्ये नमूद करण्यात आलेली आहेत.

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूद क्र ५६ (१) (ड) नुसार विद्यार्थी विकास मंडळाची व विद्यार्थी विकास कक्षाची उद्दिष्टे पूर्ण करता यावीत म्हणून विद्यापीठ प्राधिकरणाकडून नेमून देण्यात येईल असे कोणतेही अन्य काम हाती घेणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे.

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६ (१) (डः) नुसार गट (राजकीय पक्ष वगळता), समाज व अन्य व्यावसायिक मंडळे यांना, विद्यार्थी विकास मंडळाच्या कामांमध्ये सहभागी करुन घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे.

आणि

ज्याअर्थी, दिनांक २७.११.२०२१ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेमध्ये विषय क्र. ६५ (८) अन्वये विद्यापीठ शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विद्यापीठामध्ये एक स्वतंत्र ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभाग असणे गरजेचे आहे. तसेच तेथे एक कायम स्वरुपी ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर व एक सहाय्यक प्लेसमेंट ऑफीसर असणे सुध्दा गरजेचे आहे. याबाबत प्रस्ताव अधिसभेने मान्य करुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली होती.

आणि

ज्याअर्थी, दिनांक ०६.०१.२०२० रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषद सभेने विषय क्रमांक २१९ अन्वये समिती क्रमांक १९/२०१९ नुसार निर्णय घेण्यास्तव ०७ सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती

आणि

ज्याअर्थी, गठित करण्यात आलेल्या समिती क्रमांक १९/२०१९ समितीच्या दिनांक २४.०२.२०२० व दिनांक ०३.०८.२०२२ रोजी सभा संपन्न झालेल्या असून समितीने दोन्ही पदांचे वेतन, शैक्षणिक अर्हता, निवड तसेच कार्यालयाचे स्वरुप तव्दतच ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभागाची उद्दीष्टे इ. बाबत समितीने सर्वकष अहवाल तयार केला आहे.

आणि

ज्याअर्थी, समिती क्र. १९/२०१९ च्या २४.०२.२०२० व दि. ०३.०८.२०२२ रोजी सभांचे आयोजन करुन कार्यालयाने विद्यापीठामध्ये ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभागाची निर्मिती करुन त्यासाठी एक ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर व एक सहाय्यक प्लेसमेंट ऑफीसर ही पदे भरण्यासंदर्भात कार्यालयाने सादर केलेल्या माहितीचे समितीने अवलोकन केले व चर्चा केली.

आणि

ज्याअर्थी, स्वतंत्र ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभाग ही बाब विद्यार्थी विकास मंडळाचे कक्षात येत असल्यामुळे दिनांक २५.०८.२०२२ रोजी संपन्न झालेल्या विद्यार्थी विकास मंडळ सभेत विषय क्रमांक ७३ अन्वये अधिसभा दिनांक २७/११/२०१९, विषय क्रमांक ६५(८) अन्वये व्यवस्थापन परिषद सभा दिनांक ०६/०१/२०२०, विषय क्रमांक २१९ नुसार गठित करण्यात आलेल्या समिती क्रमांक १९/२०१९ अन्वये झालेल्या सभांच्या कार्यवृत्ताची व अहवालांची (सहपत्रे पुस्तिका क्रमांक ८/२०२२, पृष्ठ क्रमांक आर-१२१३ ते १२२३ अन्वये) विद्यार्थी विकास मंडळाने नोंद घेवून विचार विनिमय करुन मान्यता प्रदान केली आहे. तसेच प्रस्तावित असणाऱ्या व्यवस्थापन परिषदेसमोर मान्यता प्राप्त करण्याकरीता सादर करण्यात यावे, अशी शिफारस सर्वानुमते करण्यात आली आहे.

आणि

ज्याअर्थी, दिनांक २९.०८.२०२२ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषद सभेत विषय क्रमांक १७५ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूद क्रमांक ८ (२) (घ), ३१ (थ) व (ब) नुसार पदनिर्मिती व त्या अनुषंगाने आवश्यक विनियमावली विहित करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम ३७ (१) मधील (द) नुसार विनियम प्रारुपास व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस सादर करण्याकरीता सर्वाधिकार अधिष्ठाता मंडळास बहाल करण्यात आले.

आणि

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७५ अंतर्गत व्यवस्थापन परीषद विनियम करतील अशी तरतूद आहे.

आणि

त्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनार्थ पुढील प्रमाणे विनियम तयार करण्यात येत आहे.

१. ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभागाची निर्मिती

अ) विद्यापीठामध्ये ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभाग या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात यावी. तथापि, सदर विभागाचे नाव **Training & Placement Office** असे करावे. सदर विभागाकरीता स्वतंत्र इमारत उपलब्ध करून देऊन त्या इमारतीमध्ये सदर विभागाचे सूसज्ज कार्यालय असावे. सदर विभागाचे काम पाहण्याकरीता ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर तसेच असिस्टंट ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ही दोन पदे निर्माण करुन त्यास सहाय्यक कर्मचारी वर्ग पुरविण्यात यावेत.

ब) ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभाग (**Training & Placement Office)** तसेच ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर हे संचालक, विद्यार्थी विकास यांचे नियंत्रणात कार्य करेल.

क) विद्यापीठाकरीता ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर व असिस्टंट ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर ही नियमीत पदे मंजूर करण्याक रीता शासनास पत्र पाठविण्यात यावे. नियमित पदांना मंजूरी मिळेपर्यंत ही पदे दरवर्षी ११ महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने विद्यापीठ साधारण निधीमधून भरावे. सदर नियुक्तीस संबंधित व्यक्तीच्या कार्याच्या मूल्यमापनाच्या आधारावर मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये कमाल ३ वर्षापर्यंत मुदतवाढ देता येईल. नियुक्तीच्यावेळी 'परिशिष्ट - ब' नुसार बंधपत्र उमेदवाराकडून भरुन घेण्यात यावे.

ड) सदर विभागाकरीता विद्यार्थी विकास विभागांतर्गत स्वतंत्र अर्थशिर्ष तयार करून प्रशिक्षण अधिका-याचे मानधन **(Salary)** प्रशिक्षण खर्च, सहाय्यक कर्मचा-यांचे मानधन, कार्यशाळा खर्च आणि इतर अनुषंगिक खर्च याबाबत उपशिर्ष तयार करुन त्यामधून सदर खर्च भागविण्यात यावा.

२) **ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर/ असिस्टंट ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर या पदाची शैक्षणिक अर्हता अनुभव, वयोमर्यादा, वेतन इ. खालील प्रमाणे राहील.**

अ) **प्लेसमेंट ऑफीसर करीता** आवश्यक शैक्षणिक अर्हता – कोणत्याही शाखेतील स्नातकोत्तर पदवीधर असावा. **(Post Graduate in any discipline)**

ब) अनुभव - कोणत्याही खाजगी/शासकीय संस्थेमध्ये ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर/असिस्टंट ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर (जे लागू असेल ते) या पदावर किमान २ वर्षे काम केल्याचा (**Relevant experience of two years.)** अनुभव असणे आवश्यक.

३) निवड प्रक्रिया –

अ) सदर निवड प्रक्रिया विद्यापीठाच्या सामान्य प्रशासन विभागाद्वारे पुर्ण केल्या जाईल.

ब) इच्छुक उमेदवाराकडून जाहीरातीद्वारे अर्ज मागविण्यात येईल.

क) अर्जदारांची अर्जाची छानणी मा. कुलगुरू द्वारा गठीत केलेल्या समिती मार्फत केल्या जाईल.

ड) या समितीचे अध्यक्ष म्हणून कुलसचिव काम सांभाळतील व उपकुलसचिव (प्रशासन) हे समितीचे सदस्य सचिव राहतील.

इ) अर्जाची छानणी निकष ठरवून पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. सदर यादीस मा. कुलगुरु यांची मान्यता घेण्यात येईल

ई) पात्र यादीतील उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत (**Personal interview)** च्या माध्यमातून योग्य उमेदवारांची निवड करण्यात येईल.

४) **वेतन** (**salary**) - व इतर भत्ते- विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कार्यालयीन अधिसूचनेप्रमाणे लागु राहतील. तथापी ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसरला कामासंदर्भात बाहेर गावी उपस्थित राहण्याकरीता प्रवास भत्ता/ दैनिक भत्ता विद्यापीठ नियमाप्रमाणे लागू राहील.

५) ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभागाची **(Training & Placement Office)** उद्दिष्टे खालील प्रमाणे राहील.

अ) सदर विभागाने दरवर्षी किमान काही विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणारच, या संकल्पाने काम करावे. आणि सदर संकल्प पुर्ण करण्यासाठी विद्यापीठाच्या माध्यमातून तसेच सदर समितीच्या माध्यमातून स्थानिक उद्योग क्षेत्र, प्रादेशिक उद्योग क्षेत्र, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींशी चर्चा करुन कार्यवाही करावी.

ब)सदर विभागामार्फत दरवर्षी ३० सप्टेंबर पर्यंत संलग्नित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय तथा कलचाचणीचे माध्यमातून विविध क्षेत्रानुसार माहिती गोळा करण्यात यावी. जेणेकरून प्रथम वर्षाकरीता प्रवेशीत विद्यार्थ्यांचे प्राथमिक आकलन करता येईल. त्यानंतर विद्यार्थ्यांचा कल **(Aptitude)** लक्षात घेऊन विविध मॉडयुल्स तयार करावे.

क) सदर विभागामार्फत एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करुन त्यामध्ये विविध उद्योगाशी संबंधित व्यक्ती, महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा त्यांचे प्रतिनिधी, चेंबर ऑफ कॉमर्स सारख्या संस्थांचे प्रतिनिधी, संशोधन संस्था, विविध विद्यार्थी संघंटनांचे प्रतिनिधी, बँकींग क्षेत्रातील प्रतिनिधी, शेती व्यवसाया संबंधित प्रतिनिधी, कॉल सेंटरशी संबंधित उद्योगातील प्रतिनिधी, विविध प्रकारचे सर्व्हे करणा-या संस्थांचे प्रतिनिधी यांना बोलवावे जेणेकरून सदर कार्यशाळेच्या माध्यमातून संबंधितांची मते जाणून घेऊन त्या-त्या क्षेत्रामध्ये कोणकोणते मनुष्यबळ पुरविता येईल. त्यापद्वतीचे अभ्यासक्रम तयार करता येईल.

ड)सदर विभागामार्फत विविध महाविद्यालयांच्या मदतीने तसेच विविध जिल्हयातील ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी अधिकारी इ. घटकांच्या मदतीने विविध प्रकारची कौशल्ये तसेच कला शिकविण्याकरीता पारंपारिक कौशल्य धारण केलेल्या प्रशिक्षकांची माहिती गोळा करणे.

इ) विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट करीता समन्वय निर्माण करणे.

फ) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या विभागात समन्वय निर्माण करणे.

ई) निरनिराळया कंपनीना परिसर मुलाखतीसाठी **(Campus Interview)** आमंत्रित करणे, विद्यापीठामधील शैक्षणिक विभाग तसेच इतर महाविद्यालयातील ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट विभागातर्फे एकत्रित परिसर मुलाखतीचे **(Campus Interview)** आयोजन करणे.

उ)माजी विद्यार्थी असोशिएशन तर्फे परिसर मुलाखती आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट कार्याकरीता मदत घेणे.

ऊ)विद्यापीठातील विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील उद्योजकता, उच्च शिक्षण, इन्कुबेशन, इनोव्हेशन स्टार्ट अप इत्यादी योजनांकरीता मार्गदर्शन करणे आणि समन्वय साधणे.

ए) रिझ्युम बनविणे, समूह चर्चा करणे, मुलाखतीसाठी तयारी करणे.

ऐ) विद्यार्थ्यांच्या आंतरवासीता **(Internship)** साठी प्रयत्न करणे.

ओ)उद्योग आणि वैज्ञानिक क्षेत्रात कार्यरत नामांकित व्यक्तींचे गेस्ट लेक्चर्स आयोजित करणे.

६) <u>ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर/असिस्टंट प्लेसमेंट ऑफीसर यांची कर्तव्य:</u>

अ)संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये प्रशिक्षण आणि प्लेसमेंट कार्यक्रमाविषयी दुवा म्हणून कार्य करणे.

ब)२१ व्या शतकातील उद्योग व्यवसायाकरीता विद्यापीठाच्या पाठयक्रमित शिक्षणक्रमाव्यतिरिक्त लागणारे कौशल्य आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, विविध कौशल्य विकसन आणि आवश्यक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

क) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाकरीता मदत करणे, **(NET/SET/UPSC/MPSC/Bank etc).**

ड) परीक्षा, इनोव्हेशन प्रोजेक्ट, बाबत माहिती देणे आणि इतर सरकारी विभागांशी समन्वय साधणे.

इ) शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या आंतरवासीते **(Internship)** बाबत माहिती देणे.

ई) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची कल चाचणी, भावनिक चाचणी, मानसशास्त्रीय मापदंडावर चाचणी घेणे आणि माहिती संकलन करणे. तसेच संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठामध्ये परिसर मुलाखतीचे **(Campus Interview)** चे आयोजन करणे व या सर्व बाबींची विविध माध्यमांद्वारे प्रसिद्धी **(Publicity)** करणे.

उ) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथील माजी विद्यार्थी संघटनेकडून प्रशिक्षण आणि प्लेसमेंट कार्यक्रमाविषयी मदत घेणे.

ऊ) सीएसआर फंडद्वारे प्रशिक्षण आयोजित करणे.

ए) दरवर्षी ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसर/असिस्टंट ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट ऑफीसरने संबंधित विषयातील तज्ञ शिक्षक तसेच प्राचार्यांच्या मदतीने विविध उद्योगांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कामाची व मनुष्यबळांची माहिती जाणून घ्यावी. जेणेकरुन कोणकोणत्या कामाकरीता तसेच कोणकोणत्या स्तरावर कोणत्या कौशल्याचे मनुष्यबळाची आवश्यकता आहे. याची माहिती प्राप्त होईल व त्यानुसार कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचे दृष्टीने आवश्यक अभ्यासक्रम सुरू करता येईल.